# पुणे महानगरपालिका
## शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका
## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५

- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका संचलित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी सन २०२०-२१ करिता तात्पुरत्या स्वरुपात केवळ सहा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता दरमहा एकवट मानधन रक्कम रुपये १२०००/- (अक्षरी बारा हजार रुपये फक्त) वर करार पद्धतीवरील हंगामी प्राथमिक शिक्षक या पदाकरिता निवड, प्रतीक्षा यादी. शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे नेमणूक करण्यात येणार आहे.
- विहित करण्यात आलेली शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचे विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीचे अर्ज, गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या प्रमाणित स्वयंसाक्षांकित, छायांकित प्रतीसह शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका कार्यालय कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५ येथे जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून सात दिवसांपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेपर्यंत हस्त पोहोच स्वीकारण्यात येतील. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी केली जातील याची नोंद घ्यावी.
- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एस.ई.बी.सी,) वर्गाचे आरक्षणास मे. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने या वर्गातील जागांबाबत मे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**इंग्रजी माध्यमाच्या करार पद्धतीवरील शिक्षकांसाठी अंतिम निवड यादी खालीलप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व प्राधान्यक्रमाने निश्चित केली जाईल.**

१) इयत्ता १ ली ते १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.
२) इयत्ता १ ली ते १० वीपर्यंत इंग्रजी, १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण
३) इयत्ता १ ली ते १० वी मराठी अथवा इतर माध्यमातून व १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण
४) इयत्ता १ ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.
५) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील.

**एकूण पदे- २१४**

| अजा | अ ज | विजा अ | भजब | भजक | भजड | विमा प्र | इमाव | एस.ई.बी. सी | ईडब्लू एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | १५ | ७ | ५ | ८ | ४ | ४ | ४१ | २८ | २१ | ५३ | २१४ |

**गुणदान तक्ता -**

| तपशील | १० वी (गुण) | १२ वी (गुण) | डी.एड. (गुण) | टीईटी (गुण) | अभियोग्यता चाचणी (गुण) | एकूण (गुण) |
|---|---|---|---|---|---|---|
| भारांश | १० | १० | १० | १० | १० | ५० |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारानुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती**

**वयोमर्यादा-** (अ) वयोमर्यादा ही जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांका रोजी गणली जाईल

(ब) सर्वसाधारण खुल्या गटासाठी शासकीय नियमानुसार कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील, अपंगांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. शैक्षणिक पात्रता उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असणे आवश्यक असून गुणवत्ता धारक अर्जदारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची (इ.१० वीचे प्रमाणपत्र) स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

1) मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
2) महिला विवाहित असल्यास, विवाह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित पात्रता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन, दबावतंत्र इ. करताना आढळल्यास उमेदवारी अथवा निवड रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
4) उमेदवाराने निवड झाल्यावर १ महिन्याच्या मानधनाइतकी रक्कम रुपये १२०००/- (अक्षरी बारा हजार रुपये फक्त) सेवा अनामत म्हणून महानगरपालिकेच्या कोषागारात जमा करणे आवश्यक आहे.
5) अर्जदाराने आपले अर्ज जाहिरातीमधील विहित नमुन्यानुसार करणे आवश्यक आहे. निश्चित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे आवश्यक आहे. सदर पद हे पूर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाचे असून या पदावर उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.
6) अपूर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करण्यात येतील. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
7) शासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना आहेत व राहतील.
8) विहित मुदतीनंतर व अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
9) अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जातीचा दाखला इ.आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. सत्य प्रती जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
10) यापूर्वी शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे मनपाच्या शाळेमध्ये करारपद्धतीवर काम केलेल्या शिक्षकांचे काम असमाधानकारक असल्यास अशा उमेदवारांचा अर्ज अपात्र करणेचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.
11) उमेदवारांनी अर्जामध्ये मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
12) वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकामी मोबाईल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
13) टपालाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

स्वाक्षरी/
(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका